<u>विकास योजना- जळगांव (वाढीव हद्द)</u>

मौजे जळगांव, ता. व जि.जळगांव मधील सर्व्हे क्र.३४७/१ब मधील ५२५० चौ.मी. क्षेत्रावरील "आरक्षण क्र.११-क्रीडांगण" (भागश:) बाबत, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम १२७*(२)* अन्वये आदेश...

महाराष्ट्र शासन

नगर विकास विभाग,

चौथा मजला, मुख्य इमारत,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय, मुंबई : ४०० ०३२.

दिनांक : ०५ मार्च, २०२६

शासन निर्णय क्र.टिपीएस-३५२६/१५९/प्र.क्र.३६/२०२६/नवि-९

<u>शासन निर्णय :-</u> सोबतचे आदेश (मराठी व इंग्रजी) महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द करावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(धैर्यशील ह. पाटील)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-४०००३२.

२) मा. उप मुख्यमंत्री महोदयांचे (नगर विकास) अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-४०००३२.

३) मा. उप मुख्यमंत्री महोदयांचे (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा) अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-४०००३२.

४) मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई-४०००३२.

५) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई-४०००३२.

६) अपर मुख्य सचिव (नवि-१) नगर विकास विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-४०००३२.

७) अपर मुख्य सचिव (नवि-२) नगर विकास विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-४०००३२.

८) संचालक (नगर रचना) तथा सह सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.

प्रत,

१) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य पुणे.

२) विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक.

३) विभागीय सह संचालक, नगर रचना, नाशिक विभाग, नाशिक.

४) जिल्हाधिकारी, जळगांव.

५) आयुक्त, जळगांव महानगरपालिका, जळगांव.

६) सहायक संचालक, नगर रचना, जळगांव शाखा, जळगांव.

(त्यांना कळविण्यात येते की, सोबतच्या आदेशाच्या अनुषंगाने अधिप्रमाणित करण्यात यावयाच्या भाग नकाशाच्या पाच प्रती शासनास विहीत मार्गाने सादर करण्यात याव्यात.)

७) व्यवस्थापक, शासकिय मुद्रणालय, येरवाडा, पुणे.

(/- त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतचे शासकीय आदेश महाराष्ट्र शासनाच्या साधारण राजपत्राच्या भाग-१ नाशिक विभाग, नाशिक पुरवणी भाग १ मध्ये प्रसिध्द करुन त्याच्या प्रत्येकी ५ प्रती या विभागास, संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे व सह संचालक, नगर रचना, नाशिक विभाग, नाशिक, सहायक संचालक, नगर रचना, जळगांव शाखा, जळगांव, आयुक्त, जळगांव महानगरपालिका, जळगांव यांना पाठवाव्यात.)

८) निवडनस्ती (नवि-९).

****

महाराष्ट्र शासन

नगर विकास विभाग,

चौथा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मुंबई : ४०००३२.

आदेश

दिनांक : ०५ मार्च, २०२६

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६

क्रमांक:टिपीएस-३५२६/१५९/प्र.क्र.३६/२०२६/नवि-९:-ज्याअर्थी, जळगांव महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीची विकास योजना, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.३७) (यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधिले आहे.) चे कलम ३१ चे उप कलम *(१)* अन्वये शासनाच्या नगर विकास विभागाने अधिसूचना क्र.टिपीएस-३५९९/७३८/प्र.क्र.१४२(अ)/नवि-९, दि.११.०२.२००२ अन्वये मंजूर केली असून ती दि.०७.०४.२००२ पासून अंमलात आली आहे (यापुढे "उक्त विकास योजना" असे संबोधिले आहे) व सारभूत स्वरुपांच्या वगळलेल्या भागाची पुनर्प्रसिध्द विकास योजना शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्र.टिपीएस-३५०३/४९३/ प्र.क्र.१०२(अ)/०३/नवि-९, दि.१०.०८.२००४ अन्वये मंजूर झाली असून दि.०१.१०.२००४ पासून अंमलात आलेली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेमध्ये, सोबतच्या परिशिष्टामध्ये वर्णन केलेली, मौजे जळगांव, ता. व जि.जळगांव मधील सर्व्हे क्र.३४७/१ब मधील एकूण ५२५० चौ.मी. जागेवर (यापुढे "उक्त जागा" असे संबोधिले आहे) "आरक्षण क्र.११-क्रीडांगण" (भागश:) (यापुढे "उक्त आरक्षण" असे संबोधिले आहे) म्हणून प्रस्तावित असून उक्त आरक्षणाकरिता समुचित प्राधिकरण जळगांव महानगरपालिका (यापुढे "उक्त समुचित प्राधिकरण" असे संबोधिले आहे.) आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त समुचित प्राधिकरणाने उक्त जागा, उक्त विकास योजना अमलात आल्याच्या दिनांकापासून दहा वर्षाच्या कालावधीमध्ये संपादन केली नाही;

आणि ज्याअर्थी, उक्त जागेच्या मालकाने उक्त अधिनियमाचे कलम १२७ चे उप कलम *(१)* नुसार, उक्त समुचित प्राधिकरणावर दि.१४.०३.२०२२ रोजीची सूचना (यापुढे "उक्त सूचना" असे संबोधिले आहे) बजावून उक्त जागा, उक्त समुचित प्राधिकरणाने विहित कालावधीत संपादन केली नसल्याचे कळविले होते;

आणि ज्याअर्थी, उक्त सूचना बजावल्यानंतरही उक्त समुचित प्राधिकरणाने, विहित कालावधीत उक्त जागा संपादन केली नाही अथवा त्या संपादन करण्यासंबंधीची उक्त अधिनियमाचे कलम १२६(४) सह, भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क

अधिनियम, २०१३ चे कलम १९ अन्वयेची भूसंपादनाची अधिसूचना विहित कालावधीत प्रसिध्द केलेली नाही;

आणि ज्याअर्थी, उक्त जागेच्या मालकांनी मा.मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ, छत्रपती संभाजीनगर येथे रिट याचिका क्र.५३४४/२०२४ दाखल केली असून सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने दि.२०.०९.२०२४ रोजी अंतिम निर्णय पारीत केलेला आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त सूचना बजावल्यापासून, उक्त समुचित प्राधिकरणाने विहित कालावधीत उक्त जागा संपादन केली नाही अथवा उक्त जागा संपादन करण्यासंबधीची, उक्त अधिनियमाचे कलम १२६*(४)* सह भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १९ अन्वये भूसंपादनाची अधिसूचना विहित कालावधीत प्रसिध्द केलेली नाही. त्यामुळे या परिस्थितीत उक्त अधिनियमाचे कलम १२७*(१)* मधील तरतूदीनुसार उक्त जागेवरील उक्त आरक्षण व्यपगत झाले असल्याचे शासनाचे मत झाले आहे;

आता त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम १२७*(२)* नुसार प्राप्त अधिकारात राज्य शासन, जळगांव शहर महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीच्या विकास योजनेतील, मौजे जळगांव, ता. व जि.जळगांव मधील सर्व्हे क्र.३४७/१ब मधील ५२५० चौ.मी. क्षेत्रावरील "आरक्षण क्र.११-क्रीडांगण" (भागश:) व्यपगत झाल्याचे अधिसूचित करीत आहे व अशाप्रकारे उक्त आरक्षणातून मुक्त झालेली जमीन या संबंधित जमीनमालकास, खालील अटींच्या अधिन राहून उक्त विकास योजनेतील लगतच्या अनुज्ञेय भूवापराप्रमाणे अन्यथा अनुज्ञेय असलेल्या विकासाकरीता उपलब्ध होईल;

अट क्र.१- सूचनाकर्ते यांनी सूचनेंतर्गत उक्त आरक्षित जागेचा अद्ययावत व प्रमाणित मोजणी नकाशा सादर केलेला नसल्याने, प्रस्तुत आदेशामध्ये नमूद क्षेत्राबाबत भविष्यात कोणताही वाद अगर तक्रार उद्‌भवल्यास त्यास अर्जदार स्वत: जबाबदार राहतील.

अट क्र.२ – प्रस्तुत आदेशाच्या अनुषंगाने भाग नकाशे अधिप्रमाणित करण्यापूर्वी संबंधित जमीनमालकांनी उक्त सूचनेखालील त्यांच्या जागेचा, भूमि अभिलेख विभागाकडील अद्ययावत व प्रमाणित मोजणी नकाशा जळगांव महानगरपालिकेस तसेच सहायक संचालक, नगर रचना, जळगांव शाखा, जळगांव यांना सादर करणे आवश्यक राहील.

नगर विकास विभाग, सत्यमेव जयते, मंत्रालय, मुंबई-32.

परिशिष्ट

अनु क्र.	गावाचे नांव व सर्व्हे क्र.	जमिनीचा सर्व्हे क्र. / हिस्सा क्र.	उक्त अधिनियमाचे कलम १२७(२) अन्वये व्यपगत होणारे क्षेत्र	मंजूर विकास योजनेतील प्रस्ताव
१	मौजे जळगांव, ता.जि. जळगांव	सर्व्हे क्र.३४७/१ब	५२५० चौ.मी.	"आरक्षण क्र.११-क्रीडांगण" (भागश:)

प्रस्तुत आदेशान्वये उक्त आरक्षणामधून व्यपगत झालेले क्षेत्र दर्शविणाऱ्या भाग नकाशाची प्रत आयुक्त, जळगांव महानगरपालिका, जळगांव यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ एक महिन्याच्या कालावधीसाठी ठेवण्यात आली आहे.

प्रस्तुतचे आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in (कायदे / नियम) या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२. सत्यमेव जयते

(धैर्यशील ह. पाटील)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

GOVERNMENT OF MAHARASHTRA

URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

4th Floor, Main Building, Mantralaya,
Madam Kama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai - 400 032.

ORDER

Dated :- 05th March, 2026

The Maharashtra Regional & Town Planning Act, 1966:

No.TPS-3526/159/CR-36/2026/UD-9:- Whereas, the Development Plan of the Extended Area of the Jalgaon City Municipal Corporation has been sanctioned by the Government under the provisions of section 31*(1)* of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Maharashtra Act No. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act") *vide* Notification No.TPS-3599/738/CR-142(A)/UD-9, dated the 11.02.2002 and has come into force with effect from dated the 07.04.2002 (hereinafter referred to as "the said Development plan") and the Republished Development Plan of the excluded part of substantial nature modifications, has been sanctioned *vide* Notification No.TPS-3503/493/CR-102(A)/03/UD-9, dated the 10.08.2004 and has come into force with effect from dated the 01.10.2004 ;

And whereas, in the said Development Plan, the land admeasuring 5250 Sq.Mt. bearing Survey No.347/1B of Mauje Jalgaon, Tal. & Dist. Jalgaon (hereinafter referred to as "the said Land"), is reserved as "Site No.11-Play Ground" (Part) (hereinafter referred to as "the said Reservation"), and the Jalgaon City Municipal Corporation is Appropriate Authority for the said Reservations (hereinafter referred to as "the said Appropriate Authority")

And whereas, the said Land has not been acquired by the said Appropriate Authority, within ten years from the date on which the said Development Plan came into force;

And whereas, the Owner of the said Land, in reference to the said Reservation had served a notice dated the 14.03.2022 under section 127*(1)* of the said Act to the said Appropriate Authority, being the Planning Authority (hereinafter referred to as "the said Notice");

And whereas, even after service of the said Notice as aforesaid, the said Land had neither been acquired, within prescribed time period nor the Notification of land acquisition required under section 126*(4)* of the said Act, read with section 19 of the Right to Fair Compensation of Transparency in Land Acquisition, Rehabilitation & Resettlement Act, 2013, has been published by the said Appropriate Authority within prescribed time period from the date of the service of the said Notice under sub-section *(1)* of section 127 of the said Act;

And whereas, the owner of the said Land has filed Writ Petition No.5344/2024 before the Hon'ble Bombay High Court, Aurangabad Bench, Chhatrapati Sambhajinagar and the final order is passed on dated the 20.09.2024 by the Hon'ble High Court;

And whereas, it is observed that, the said Land had neither been acquired, within prescribed time period from the date of the service of the said Notice, nor Notification of land acquisition required under section 126*(4)* of the said Act, read with section 19 of the Right to Fair Compensation of Transparency in Land Acquisition, Rehabilitation & Resettlement Act, 2013, been published within prescribed time period by the said Appropriate Authority. And, in consequence thereof, the Government of Maharashtra is of opinion that, the said Reservation, on the said Land stands lapsed as per the provisions of section 127*(1)* of the said Act;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-section *(2)* of section 127 of the said Act and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra, as mentioned in the Annexure below, hereby notifies that, the said Reservation i.e "Site No.11-Play Ground" (Part) proposed on the land admeasuring 5250 Sq. Mt., bearing Survey No.347/1B of Mauje Jalgaon, Tal. & Dist. Jalgaon, as specified in the Sanctioned Development Plan of the Extended Area of Jalgaon Municipal Corporation, stands lapsed and the area so released will be available to the owners for the purpose of development as otherwise permissible in the case of adjacent land under the said Development Plan, subject to following conditions.

Condition No.1 –Since the noticer have not submitted a recent and certified measurement sheet of the said Land, the noticer themselves will be responsible for any dispute or complaint arising in the future regarding the area mentioned in the this Order.

Condition No.2 – Before authenticating the part plan in accordance with the very Order, the concerned land owner will be required to submit a recent and certified measurement sheet of their proposed area from the Land Records Department to the offices of the Commissioner, Jalgaon Municipal Corporation, Jalgaon and the Assistant Director of Town Planning, Jalgaon Branch, Jalgaon.

ANNEXURE

Sr. No.	Name of the Village, Taluka and Dist.	Survey No. / Hissa No.	Area lapsed under section 127*(2)* of the said Act	Reservation of sanctioned Development Plan
1	Mauje Jalgaon, Taluka & Dist. Jalgaon	Survey No.347/1B	5250 Sq.Mt.	"Site No.11-Play Ground" (Part)

A copy of the Part Plan, showing the area of the said Reservation, which has been lapsed *vide* this Order, is available in the offices of the Commissioner, Jalgaon City Municipal Corporation, Dist. Jalgaon, during office hours on all working days for inspection of public for the period of one month.

This Order shall also be published on the Govt. website www.maharashtra.gov.in (Acts/ Rules).

By order and in the name of the Governor of Maharashtra,

नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई - 32.

(Dhairyashil H. Patil)
Section Officer to Government